

**प्रेसनोट, दिनांक ०४/०६/२०१८**

आज दिनांक ०४/०६/२०१८ रोजी सकाळी ०६.०० वा. चे सुमारास, खडक पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये घर क्र. ५०२, घोरपडे पेठ, शिवाजी रोड, पुणे येथील मुंबई फुड मॉलचे दुकानासमोर असलेल्या फुटपाथवर एक अनोळखी इसम, वय अंदाजे ३० ते ३२ वर्षे, रंगाने गोरा, अंगाने मजबुत, चेहरा गोल, डोकीस पुढील बाजुस अर्धवट टक्कल असलेला, उंची अंदाजे १६७ से.मी. अंगामध्ये पिवळया रंगाचा टी शर्ट व निळया रंगाची फॉरर्मल पॅन्ट, पॅन्टला S सिक्युरीटी नावाचे स्टिलचे बक्कल असलेला काळा बेल्ट, पायामध्ये काळ्या रंगाचे बुट, उजव्या हाताचे पोटरीवर "कचरू गणपत गवळी" असें गोंदलेले अशा वर्णनाचा इसम रक्ताचे थारोळ्यात मृत अवस्थेत मिळुन आलेला आहे. त्याचे छातीचे डाव्या बाजुचे बरगडीचे खाली पोटावर तीक्ष्ण हत्याराने भोकसल्याची जखम आहे.

सदर इसमास कोणीतरी अज्ञात इसमाने, अज्ञात कारणाकरीता तीक्ष्ण हत्याराने भोकसुन त्याची हत्या केली आहे. सदर प्रकरणी तपास चालु असुन, सदर मयत इसमाची ओळख अद्याप पटलेली नाही. त्याचे नातेवाईकांचा शोध घेणे चालु आहे. सदर वर्णनाचे इसमास कोणी ओळखत असल्यास खालील नमुद क्रमांकांवर तात्काळ संपर्क साधावा.

**खडक पोलीस ठाणे, फोन क्र. ०२०-२४४५२०९५/०२०-२४४७६४२२.**
**श्री. राजेन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक - ९०११९०८६७४,**
**संभाजी शिर्के, पोलीस निरीक्षक (गुन्हे) - ९६६५६६०३६५.**
**पुणे शहर पोलीस नियंत्रण कक्ष - ०२०-२६१२२८८०/२६१२६२९६/२६२०८२५०/१००**

दि.०४/०६/२०१८